**खुरटलेली झुडपे**

**ठळक मुद्दे-**

या पाठातून तुम्ही खालील घटकांचा अभ्यास करू शकाल-

१. आप्पा तारे यांच्या उदाहराणातून लेखकाने मांडलेले विचार
२. आप्पा तारे उपेक्षित कलावंतांचे प्रतिनिधी म्हणून चित्रित केलेले त्यांचे जीवन
३. माणसांच्या प्रवृत्तीचा केलेला विचार
४. लेखाची मांडणी व वैशिष्ट्ये

**प्रस्तावना**

आत्तापर्यंत तुम्ही मराठी साहित्यातील काही वाङमय प्रकारांचा अभ्यास केलात. प्रत्येकाचे काही वेगळे वैशिष्ट्य होते त्यामुळे वाचनाचा आनन्द तुम्हाला मिळाला असणार..तसेच साहित्यिकांचे अनुभव आणि त्याची अभिव्यक्ती समजून घेतानाही तुम्हाला आनंद मिळाला असणार. आज एका लेखाचा अभ्यास करतानाही विचारांचा आनंद आपण घेणार आहोत.

प्रथम पाठ वाचा.आता प्रत्येक परिच्छेद वाचा आणि त्या परिच्छेदातील मुद्दा/मुद्दे टिपा. त्या मध्ये विचारांची मांडणी कशी केली आहे ते लक्षात घ्या.या पाठाचे तीन विभाग पडतात.विषय प्रवेशासाठी घेतलेले बोन्सायचे उदाहरण, मूर्तिकार आप्पा तारे यांच्याबद्दल अनुभव, शेवटी विषय प्रवेशाच्या वेळी मांडलेल्या विचारांचा विस्तार आणि त्यातून माणसांच्या प्रवृत्तीचे दर्शन.

**विचारांसाठी निमित्त –**

पुण्यातील एक बोन्साय झाडांच्या प्रदर्शनात लेखकाने जी झाडे पाहिली त्यावरून त्यांचे विचार चक्र सुरु झाले. खरे म्हणजे बोन्साय ही एक कला आहे, हे तुम्ही वाचले आहे. त्या पाठीमागील हेतूही झाडांचा सहवास हा आहे. पण लेखकाला मात्र त्यातील कृत्रिमता निसर्ग क्रमाविरुद्ध जाण्यासारखी वाटली. निसर्गाला मानवाने आपल्या मताप्रमाणे खुजे म्हणजे लहान करणे हे लेखकाला पटले नाही. त्याचा निषेध नोंदवीत लेखक माणसाच्या प्रवृत्तीवर वेगळा विचार नोंदवितात.

**लेखातील महत्वाचा विचार_**

आपल्या छंदासाठी माणसाने निसर्गाला हवे तसे वाकविणे ह्या प्रवृत्तीचा वेगळा संदर्भ लेखक देतो.प्रत्येक माणसात काही ना काही गुण असतात. पण लेखकाच्या मते, काही माणसांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात मोठे होण्यात अन्य व्यक्तींचा अडथळा येतो. अशा व्यक्ती आपापल्या क्षेत्रात इतरांवर अधिकार

गाजवितात, इतरांच्या सहज प्रवृती, त्यांचे गुण  विकसित होऊ देत नाहीत. त्यामुळे गुण असूनही अशा अन्याय झालेल्या व्यक्ती समाजात मोठेपणा मिळवू शकत नाही. याचे लेखकाला दु;ख होते.

**विचाराच्या स्पष्टीकरणार्थ दाखला –**

आपल्या विचाराला पुरावा म्हणून लेखक आपल्याच जीवनातील एक अनुभव मांडतात.त्यांच्या गावातील आप्पा तारे एक साधे व्यक्तिमत्व. अन्य व्यक्ती जशा संसाराच्या जबाबद-या सांभाळत आयुष्य घालवितात, तसेच आयुष्य आप्पांनी घराच्या जबाबदा-या सांभाळत घालविले. फरक इतकाच की त्याचा स्वत:चा असा संसार नव्हता. दोन-चार तयार मूर्ती आणून तो गावाच्या लोकांना मदत करत होता.

पुढे त्याने स्व:त गणपतीच्या मूर्ती करायला सुरवात केली. आप्पा प्रथम सुंदर मूर्ती करू शकले नाहीत . पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. चांगल्या मूर्ती करण्याच्या ध्यासातून त्याने वेगवेगळया लोकांकडून शिकत त्यात प्राविण्य प्राप्त केले. सुरूवातीला आप्पांची टवाळी करणारे लोकही त्यांच्या कलेला मानू लागले. मुलांना तर त्या मूर्तींचे विसर्जन करायला जड जाई.

**अनुभवातून पुन्हा विचाराकडे-**

गावोगावी कलेची सेवा करणा-या अशा कलावन्तांचे हवे तसे कौतुक समाजाकडून होत नसल्याची खंत लेखक व्यक्त करतो. त्यांच्या कलेचे मोठेपण समाजाने मान्य करावे, त्यांना योग्य तो मान द्यावा ,असे लेखक आवर्जून सांगतात. त्यांना कदाचित संधी मिळाली असेल, कधी गरीबी आड आली असेल. तर कधी पुढे जाण्याची ओढ निर्माण झाली नसेल. अशा कारणांचा  विचार करताना लेखकाने रूपक अलंकाराचा सुंदर वापर केला आहे. अशा नकारात्मक वृत्तीला लेखक झाडे कुरतडणा-या अळया म्हणतो.

अशा प्रतिकूल परिस्थितीतूनही योग्य संधी मिळाली तर त्यांना यश मिळेल असा विश्वास ते व्यक्त करण्यासाठी  त्यांनी जमीन, पाणी आणि आकाश या प्रतीकांचा सुंदर वापर केला आहे.

लेखकाची भाषाशैली –एकातून दुसरा, त्यातून तिसरा विचार अशी लेखाची मांडणी केली आहे.

आप्पांचे विशेष सांगताना अत्यंत पोटतिडकीने उपेक्षित कलावंताचे दु:ख मांडले आहे.

बोलीभाषेच्या वापराने वातावरण निर्मिती झाली आहे.

वाक्प्रचारांचा केलेला वापर विषय परिणामकारक करतो.

काही वाक्य आपल्याला विचार करायला लावतात. उदा. आभाळात झेपावण्याच सामर्थ्य पंखात असतानाही त्यांचे पाय मातीशीच जखडून का राहावेत?

अशीच आणखीन विचार करायला लावणारी विधाने शोधा.

**उजळणी प्रश्न**

अ.  खालील प्रश्नांची उत्तरे पाठाच्या आधारे ३०ते ४० शब्दांत लिहा.

१. ...असे कितीतरी अज्ञात जीव असतील आणखी! यांचं सोन का होऊ नये? असे लेखक का म्हणतो?

२. लोकांच्या चेष्ट्येमुळे आप्पांमध्ये का फरक पडला नाही?

ब. खालील प्रश्नांची उत्तरे ५०ते ६० शब्दांत लिहा.

१.आप्पा तारे यांचे व्यक्तिमत्त्व तुमच्या शब्दांत रेखाटा.

२. 'खुरटलेली झुडपे' हे पाठाचे शीर्षक तुम्हाला कोणता विचार करायला लावते?. ३.तुमच्या जीवनात असा कोणता प्रसंग आला होता का की ज्यामुळे लेखकाचा विचार तुम्हाला पटला आहे , त्याचे चित्रण करा.

क. खालील विधानांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१.आभाळात झेपावण्याच सामर्थ्य पंखांत असतानाही त्यांचे पाय मातीशीच जखडून का राहावेत?

२. त्यांनी कुणाचं वाईट केलेलं असतं, म्हणून त्यांच्या नशिबी हे खुलेपण यावं?

**मुक्त प्रश्न**

१.आप्पांसारख्या तुम्हाला माहीत असलेल्या व्यक्तींचा सन्मान तुम्हाला करावासा वाटतो आहे. तुम्ही तो कसा कराल? यावर १० ओळी लिहा.

२. हा पाठ वाचल्यावर 'पराधीन आहे जगति पुत्र मानवाचा, दोष ना कुणाचा' या ओळीचा अर्थ तुम्हाला पटतो का ते सकारण लिहा.